पुढारी | पुणे, शुक्रवार
५ ऑक्टोबर २०१८

# ‘फ्लाइंग यंगस्टर्स’तर्फे स्वछता अभियान

पुणे : प्रतिनिधी

पंख व क्विकहिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत, रयत शिक्षण संस्थेच्या हुतात्मा राजगुरू शाळा यांच्या सहकार्याने फ्लाइंग यंगस्टर्स गटाने बुधवारी मारुती मंदिर परिसर, वडारवाडी येथे स्वछता अभियान राबवले.

यामध्ये राजगुरू शाळेतील विद्यार्थ्यांनी वडारवाडी परिसरातील कचरा उचलून परिसर स्वच्छ केला. शाळेतील विद्यार्थ्यांनी स्त्री शिक्षणावर पोवाडा सादर केला. तर पंख संस्थेच्या समुपदेशकांनी स्वच्छतेवर आधारित पथनाट्य सादर केले. कार्यक्रमास महापौर मुक्ता टिळक, नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे, नगरसेवक सिद्धार्थ शिरोळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी महापौर मुक्ता टिळक यांनी विद्यार्थ्यांनी केलेल्या स्वच्छता अभियानाचे कौतुक केले. शाळांगण समुपदेशकांनी सादर केलेल्या स्वच्छतेच्या पथनाट्याचे कौतुक करून लोकांच्या मनावर चांगल्या गोष्टी बिंबवण्यासाठी अशा प्रकारच्या पथनाट्याची अत्यंत गरज आहे. नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे व नगरसेवक सिद्धार्थ शिरोळे यांनी मुलांच्या कामाचे विशेष कौतुक करून देशाच्या प्रगतीसाठी अशा उपक्रमांची गरज आहे व ही मुले एक प्रकारे देशसेवेत हातभार लावत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी भाबड यांनी केले. अजय शिर्के यांनी आभार मानले.



फ्लाइंग यंगस्टर्स गटामार्फत राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानप्रसंगी मार्गदर्शन करताना महापौर मुक्ता टिळक.